# घटक ३ : (अ) लोकशाही कशी नांदेल ?

## अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा
३.३ उताऱ्याचा अभ्यास
 ३.३.१ उताऱ्याया पहिल्या भागाचा अभ्यास
 ३.३.२ लोकशाही आणि डॉ. आंबेडकर.
 ३.३.३ भारतात लोकशाही नवीन नाही.
 ३.३.४ सनदशीर मार्गच श्रेष्ठ.
 ३.३.५ विभूतिपूजा लोकशाहीला मारक
 ३.३.६ उताऱ्याच्या दुसऱ्या भागाचा अभ्यास
 ३.३.७ सामाजिक व आर्थिक लोकशाही
 ३.३.८ एक माणूस, एक मूल्य
 ३.३.९ लोकशाहीच्या रक्षणासाठी आपल्यावरील जबाबदाऱ्या.
३.४ नमुना उत्तरे.
३.५ अधिक अध्ययन.
 ३.५.१ लोकशाही आणि बलोपयोग
 ३.५.२ लोकशाहीविषयक भारतीय राज्यघटनेतील काही विचार
 ३.५.३ लेखक परिचय
३.६ सारांश
३.७ सरावासाठी स्वाध्याय
३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

प्रस्तुत विभाग दोन मध्ये घटक ३ व ४ समाविष्ट केले आहेत. या दोन्ही घटकात सामाजिक विज्ञानांतर्गत संहितांचा अभ्यास करावयाचा आहे. सामाजिकविज्ञान विद्याशाखेत राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, कायदा लोकसख्याशास्त्र, ग्रामीणविकास, समाजशास्त्र, समाजसेवा इ.शाखांचा समावेश होतो.

घटक तीन मध्ये दोन संहिता समाविष्ट केल्या आहेत त्या म्हणजे

(अ) लोकशाही कशी नांदेल ? : डॉ.बाबासाहेब आंबेडकर

(ब) लोकनीती आणि कायधाचे राज्यः न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

या घटकाचे अध्यन केल्यावर तुम्हाला -

* लोकशाहीची व्याख्या स्पष्ट करता येईल.
* लोकशाही व हुकुमशाही यातील भेद लक्षात येईल.
* लोकशाहीची यशस्विता कोणत्या गोष्टींवर अवलबून आहे ते समजेल.
* लोकशाही राज्यव्यवस्थेत तुम्हाला कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडावयाच्या आहेत ते स्पष्ट होईल.

## ३.१ प्रास्ताविक

(१) पधरा ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला. भारतीय घटना समितीने विविध अंगानी चर्चा करून भारतीय राज्यघटना सिध्द केली. या राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा घटनासमितीने गौरव केला. घटनासमितीत डॉ. आंबेडकरांनी जे समारोपाचे भाषण केले त्यातील काही भाग अध्ययनासाठी निवडला आहे.

(२) २६ जानेवारी १९५० रोजी भारत सार्वभौम प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशात अस्तित्वात आले. या देशातील जनतेने केवळ लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारली नाही तर लोकशाही जीवनपध्दती स्वीकारली. आपल्या समारोपाच्या भाषणात या देशात लोकशाही यशस्वी व्हावी आणि निरंतर नांदावी म्हणून काही मूलगामी विचार डॉ.आंबेडकरांनी मांडले आहेत.

(३) डॉ. आंबेडकरांचे म्हणणे असे आहे की सामाजिक अगर आर्थिक उद्दिष्टे प्राप्त करून घेण्यासाठी आपण घटनात्मक मार्गाचाच कटाक्षाने अवलंब केला पाहिजे. तसेच विभूतिपूजेचा त्याग केला पाहिजे.कारण व्यक्तीपेक्षा राष्ट्र मोठे असते. राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपान्तर केले पाहिजे आणि आपण सर्व भारतीय एक आहोत ही भावना जोपासली पाहिजे.

## ३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टिपा

चिंताक्रांत– काळजीने युक्त.
अनियंत्रित - कोणतेही नियंत्रण किंवा बंधन नसलेली.
पार्लमेंट - संसद, लोकसभा.
प्रतोद - विधिमंडळात पक्षसदस्यांना आदेश देणारी व्यक्ती
चीज - वस्तू
जबर - मोठा
रक्तरंजित - रक्तपातयुक्त
वर्ज्य करणे - टाळणे, सोडून देणे;
सुरूंग लावणे - नष्ट करणे, उद्ध्वस्त करणे
काडीमोड करणे - दूर होणे, बाजूला जाणे
अलग - निराळा
अमाप - पुष्कळ
पदार्पण करणे - प्रवेश करणे
अवलंबन करणे - स्वीकार करणे
लोकशाही - लोकांची, लोकांकडून चालवलेली आणि लोकांच्यासाठी असलेली राज्यव्यवस्था.
अविश्वास ठराव - सत्तारूढ पक्षावर आमचा विश्वास नाही असा विरोधकांनी आणलेला ठराव.
जॉनस्टुअर्ट मिल - पाश्चात्य तत्ववेत्ता
त्रिवेणी संगम - गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा अलाहाबाद जवळ संगम झाला आहे. तो पवित्र मानतात.
अराजकता - अंदाधुंदी आणि बेबंदशाही माजली आहे अशी स्थिती.

## ३.३ उताऱ्याचा अभ्यास

### ३.३.१ उताऱ्याच्या पहिल्या भागाचा अभ्यास

ता. २६ जानेवारी १९५० रोजी भारत लोकशाही राष्ट्र बनणार आहे, ते या अर्थाने की, त्या दिवसापासून भारतास, लोकांचे,लोकांकरिता चालविलेले व लोकांकडून चालविले गेलेले सरकार लाभेल, तोच विचार, लोकशाहीच्या संदर्भात माझ्या मनात येतो. भारताच्या लोकशाही घटनेचे काय होईल ? भारतात लोकशाही चालू शकेल की लोकशाहीस पुनः मुकावे लागेल ? हा दुसरा विचार माझ्या मनामध्ये येतो; आणि पहिल्या विचाराइतकाच हाही विचार मला चिंताक्रांत बनवितो.

भारताला लोकशाही माहीत नव्हती असे नव्हे. एक काळ असा होता की, भारत लोकसत्ताक राज्यांनी बहरला होता, आणि काही प्रदेशांत राजेशाही असली तरी ती, लोकमतावर अवलंबून होती, किंवा मर्यादित सत्तेची होती. त्या वेळी राजेशाही अनियंत्रित मुळीच नव्हती. भारताला पार्लमेंट माहीत नव्हते, की पार्लमेंटरी पद्धती माहीत नव्हती, असे नव्हे. बौध्द भिक्षुसंघाचा अभ्यास केल्यास दिसून येईल की, भिक्षुसंघ म्हणजे पार्लमेंटच होते, आणि आधुनिक काळातील पार्लमेंटच्या कामकाजाचे बहुतेक सर्व नियम बौध्द भिक्षुसंघाना माहीत होते व त्या नियमांचे ते पालनही करीत होते. बौद्ध भिक्षुसंघाचे नियम विविध प्रकारचे होते. संघात बसायच्या जागेबद्दलचे नियम होते, ठराव आणयाबद्दलचे नियम होते, ठरावांचे होते, किमान उपस्थितीबद्दलचे होते, मुख्य प्रतोदाबद्दलचे होते, मत मोजणीबद्दलचे होते, मतदान पत्रिकेबद्दलचे होते, अविश्वासाच्या ठरावाबद्दलचे होते, कायदेशीरपणाच्या मंजुरीबद्दलचे होते, अंतिम अचे अनेक प्रकारचे नियम बौद्ध भिक्षुसंघामध्ये होते. भगवान बुद्धांनी हे नियम भिक्षुसंघाना लागू केले होते तरी, त्या काळी, राजकीय कायदेमंडळातून ते त्यांनी घेतले असणे शक्य आहे.

भारत ही लोकशाही गमावून बसला. भारतास लोकशाहीस पुनः मुकावे लागेल काय ? मला माहीत नाही. परंतु एक गोष्ट भारतासारख्या देशात शक्य आहे, ती गोष्ट ही की, भारतात लोकशाहीचा वापर कित्येक वर्षे नसल्यामुळे ही काहीतरी नवी चीज वाटण्याचा संभव असून, लोकशाहीची जागा हुकुमशाही घेण्याचा धोका आहे. आज भारताची लोकशाही नूतन बालक आहे. कदाचित लोकशाहीचे रूप वरती राहील आणि वस्तुस्थितीत हुकुमशाही नांदेल हे शक्य आहे. दुसऱ्या प्रकारचा धोका तर जबर आहे.

आपल्याला निव्वळ रूपातच नव्हे तर वस्तुस्थितीतही लोकशाही हवी असेल तर आपण काय केले पाहिजे ? आपली सामाजिक अगर आर्थिक उद्दिष्टे प्राप्त करून घेण्यासाठी आपण घटनात्मक मार्गाचाच कटाक्षाने अवलंब केला पाहिजे. आपण रक्तरंजित क्रांतीचा मार्ग वर्ज्य केला पाहिजे, असा त्याचा अर्थ आहे. आपण कायदेभंग, असहकार व सत्याग्रह या पध्दती वर्ज्य केल्या पाहिजेत हा त्याचा अर्थ आहे. जर, आर्थिक व सामाजिक उद्दिष्टे प्राप्त करून घेण्यासाठी घटनात्मक मार्गच उरला नाही, तर बेसनदशीर मार्गाचे समर्थन होऊ शकत नाही. बेसनदशीर मार्ग म्हणजे दुसरे तिसरे काहीनसून अराजकतेचे व्याकरण आहे, आणि जेवढया लवकर असे मार्ग वर्ज्य करता येतील तितके ते भारताच्या हिताचे आहे.

लोकशाही टिकविण्याबाबत, जॉन स्टुअर्ट मिलने जो इशारा दिला तो इशारा लोकशाहीच्या संवर्धनासाठी उत्सुक असलेल्या लोकांनी पाळला पाहिजे ही दुसरी गोष्ट मला सांगावयाची आहे. तो इशारा असा : एखादा मनुष्य कितीही मोठा असला तरी त्याच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पू नका, अगर त्याजवर इतका विश्वास टाकू नका की त्यामुळे तो लोकशाही संस्थांचे स्वरूप बदलून टाकील. एखाद्या थोर थोर पुरुषाने जीवनभर देशसेवा केली असेल पर त्याबद्दल कृतज्ञ राहण्यात काहीही चूक नाही. परंतु कृतज्ञ तेसही मर्यादा आहेत.

### ३.३.२ लोकशाही आणि डॉ. आंबेडकर.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटनासमितीत १५ नोव्हेंबर १९४९ रोजी जे ऐतिहासिक भाषण केले त्यातला हा उतारा आहे. लोकशाही म्हणजे काय ? या शब्दाची व्याख्या आपण नेहमी अशी करतो की लोकांचे, लोकांकरता चालवलेले व लोकांकडून चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही राज्य ! लोकशाही ही केवळ एक राज्यपध्दती नव्हे तर ती एक जीवनपध्दती आहे.

डॉ.आंबेडकरांना चिंता आहे की या देशात लोकशाही कशी नांदेल ? कारण त्यांना वाटत होते की आपल्यामध्ये अनेक जाती आहेत,अनेक पंथ आहेत. या परस्परात द्वेष पसरवणाऱ्या आणि कलहाची बीजे पेरणाऱ्या जातिव्यवस्थेचा अंत झाल्याशिवाय लोकशाही कशी नांदेल ? परंतु या शिवाय भारतात भिन्नभिन्न व परस्पर विरोधी असणारे पक्ष आहेत. निरनिराळे पक्ष आपापल्या तत्त्वज्ञानाला भारतापेक्षा श्रेष्ठत्वाचे स्थान देतील काय ? पक्ष काय किंवा व्यक्ती काय त्यापेक्षा देश मोठा आहे. म्हणून डॉ.आंबेडकर म्हणत की मी प्रथम भारतीय आहे आणि अखेरही भारतीयच आहे.

### ३.३.३ 'भारतात लोकशाही' नवीन नाही.

डॉ.आंबेडकरांचे म्हणणे आहे की लोकमतावर अधिष्ठित असलेली लोकसत्ताक राज्ये भारतात होती. बौध्द भिक्षुसंध म्हणजे पार्लमेंटच होते. भगवान बुध्दाने निर्माण केलेला संघ हा आदर्श समाज कसाअसावा याची एक छोटीशी प्रतिकृती होती. हा संघ म्हणजे शोषणमुक्त समाजेव्यवस्थेचा आदर्श होता. बौध्दांचा संघ हा गुलामगिरी, भ्रष्टाचार, अनाचार या विरूध्द विद्रोही भूमिका घेऊन उभा राहिला. हा विद्रोह विध्वंसक नव्हता. स्वातंत्र्य, बंधुत्व, समता, सामाजिक न्याय या मूल्यस्थापनेसाठी विद्रोह होता.

### ३.३.४ सनदशीर मार्गच श्रेष्ठ.

या उताऱ्यात डॉ.आंबेडकरांनी दहशत निर्माण करून आपले प्रश्न सोडवण्याऐवजी सनदशीर मार्गाचा अवलंब करावा असे सुचवले आहे. सामाजिक व आर्थिक परिवर्तनासाठी रक्तरंजित क्रान्तीचा मार्ग नको असा त्यांचा आग्रह आहे. कायदेभंग, सत्याग्रह असहकार या पध्दती वर्ज्य कराव्यात असा त्यांचा अभिप्रेत अर्थ आहे. म्हणून बेसनदशीर मार्गाचे आचरण म्हणजे अराजकतेला आमंत्रण आहे.

### ३.३.५ विभूतिपूजा लोकशाहीला मारक

मिल या तत्त्ववेत्याचे म्हणणे होते की कोणत्याही व्यक्तीच्या चरणी ती कितीही मोठी असो - आपले स्वातंत्र्य अर्पू नका. व्यक्तीपेक्षा देश मोठा हे मुख्य विचारसूत्र. या देशात विभूतिपूजेचा रोग बळावला आहे. त्यामुळे विभूतिपूजेच्या नादात विचारांची पूजा दुर्लक्षिली जाते. स्वामी विवेकानंद म्हणत की व्यक्तीपेक्षा तत्त्वांसाठी जगा. विचाराचे बळ हेच खरं बळ.

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(क) एका वाक्यात उत्तर द्या.

१) भारतीय राज्य घटने प्रमाणे राज्यकारभार कोणत्या दिवशी सुरू झाला ? त्याला कोणता दिवस म्हणतात ?

..........................................................................................................

२) घटनेने मान्य केलेली मानवी मूल्ये कोणती ?

..........................................................................................................

३) जॉन स्टुअर्ट मिल कोणते विचारसूत्र मांडतो ?

..........................................................................................................

४) लोकशाही कशी नांदेल या बद्दल डॉ.आंबेडकरांना का चिंता वाटते ?

..........................................................................................................

(ख) बौध्द भिक्षुसंघ म्हणजे पार्लमेंट असे डॉ.आंबेडकर का म्हणतात ?

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

(ग) आपापले प्रश्न सोडवण्याचे बेसनदशीर मार्ग कोणते ?

..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................
..........................................................................................................

(घ) मग सनदशीर मार्ग कोणते ?

१ ..........................................................................................
२ ..........................................................................................
३ ..........................................................................................
४ ..........................................................................................

(ङ) 'समाज'या शब्दाला 'इक' प्रत्यय लावून विशेषण तयार करता येते ते म्हणजे सामाजिक. याच तऱ्हेने पुढील शब्दांपासून विशेषणे बनवा.

| | |
|---|---|
| नीती ........ | धर्म........ |
| अर्थ ........ | परंपरा........ |
| भाषा ........ | लक्षण......... |

## ३.३.६ उताऱ्याच्या दुसऱ्या भागाचा अभ्यास.

लोकशाही कशी नांदेल ?

तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती ही की, आपण केवळ राजकीय लोकशाहीवर संतुष्ट राहता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे सामाजिक लोकशाहीत रूपांतर केले पाहिजे. राजकीय लोकशाहीच्या पाया सामाजिक लोकशाहीवर भक्कमपणे आधारल्याशिवाय राजकीय लोकशाही टिकत नाही. पण सामाजिक लोकशाही म्हणजे तरी काय ? समता, स्वातंत्र्य व विश्वबंधुता या तत्त्वांवर आधारलेला जीवनमार्ग म्हणजे सामाजिक लोकशाही; ही तीन तत्त्वे वेगवेगळे मानता कामा नये, त्यांचा त्रिवेणीसंगम आहे. त्यांपैकी एक तत्त्व दुसऱ्या तत्त्वापासून वगळणे म्हणजे लोकशाहीच्या मूळ हेतूस सुरुंग लावण्यासारखे आहे. समतेपासून स्वातंत्र्याची काडीमोड करता येणार नाही, की स्वातंत्र्यापासून समतेची काडीमोड करता येणार नाही. किंवा स्वातंत्र्य व समता ही दोन्ही विश्वबंधुत्वापासून अलग करता येणार नाहीत. समता नसेल तर केवळ स्वातंत्र्यामुळे मूठभर लोकांचा वर्ग सत्ताधारी बनेल. स्वातंत्र्याशिवाय समता असेल तर व्यक्तीचा स्वतःहून प्रथम काम करण्याचा हुरूप मारून टाकला जाईल. विश्वबंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य व समता योग्य मार्गाने जाणार नाहीत. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी पोलिसांची जरूर लागेल. भारतीय समाजात आज दोन गोष्टी नाहीत हे मान्य करून आपण सुरूवात केली पाहिजे. त्यांपैकी एक गोष्ट म्हणजे समता. सामाजिक दृष्टया भारतीय समाज विषमतेच्या तत्त्वावर आधारलेला आहे. ते विषमतेचे तत्त्व म्हणजे काही जणांना उच्च स्थान, तर उरलेल्यांना नीच स्थान अशाप्रकारचे आहे. आर्थिक दृष्टया भारतीय समाज असा आहे की, काही जणांना अमाप धनसंपत्ती आहे, तर कित्येक कोट्यावधी लोक महाभयंकर दारिद्र्यात खितपत पडलेले आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी आपण परस्पर विरोधाने भरलेल्या जीवनात पदार्पण करणार आहोत. राजकारणात आपल्याला समता असेल, परंतु सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत विषमता असेल. एक मनुष्य एक मत, व एक मत,एक मूल्य हे तत्त्व राजकारणात आपण मान्य करीत आहोत; परंतु सामाजिक रचनेमुळे, सामाजिक व आर्थिक जीवनात आपण एक मनुष्य,एक मूल्य हे तत्त्व नाकारण्याची क्रिया तशीच पुढे चालू राहणार आहे. हे परस्परविरोधी जीवन आपण किती दिवस चालविणार आहोत ? आपण हे विसंगत जीवन फार काळ चालविले तर, राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणू. ही विसंगती शक्य तितक्या लवकर आपण दूर केली पाहिजे; नाहीतर जे लोक विषमतेमुळे होरपळून निघालेले आहेत ते लोक या घटनासमितीने मोठ्या परिश्रमाने उभी केलेली लोकशाही उडवून देतील.

आणखी एका गोष्टीची उणीव आहे, ती म्हणजे विश्वबंधुत्वाच्या तत्त्वास मान्यता देण्याचा अभाव. विश्वबंधुत्वाचा अर्थ काय ? मानवामधील बंधुभावाची भावना म्हणजे विश्वबंधुत्व. जर सर्व भारतीयांमध्ये बंधुभाव असेल तरच भारतीय लोक एक आहेत असे म्हणता येईल.

या उताऱ्यातील मुख्य मुद्दे

* राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक लोकशाही हवी.
* आपल्या समाजात समता नाही आणि बंधुत्वाची भावना नाही.
* 'एक मनुष्य,एक मूल्य' हे तत्त्व लोकशाहीचा आत्मा.

## ३.३.७ सामाजिक व आर्थिक लोकशाही.

डॉ. आंबेडकरांच्या मते समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व या तत्त्वांवर आधारलेली समाजव्यवस्था म्हणजे लोकशाही. समाजात विकासाची समान संधी लाभणे आणि समाजात जी संपत्ती निर्माण होईल त्याची समान वाटणी करणे म्हणजे आर्थिक लोकशाही.

सामाजिक व आर्थिक जीवनात अनेक प्रकारची विषमता आहे. राजकीय सत्ता, आर्थिक सत्ता, ज्ञानसत्ता,धर्मसत्ता, सांस्कृतिक सत्ता ही मूठभर गटांच्या हातात राहिली तर ही सर्व शोषणाची हत्यारे बनतील आणि लोकशाहीचे रूपांतर हुकुमशाहीत होईल.

## ३.३.८ एक माणूस, एक मूल्य

'एक माणूस एक मूल्य' हे तत्त्व हा लोकशाहीचा आत्मा आहे. 'एक माणूस,एक मत' हा लोकशाहीचा आत्मा नव्हे. ते या देशातील निवडणुकांसाठी स्वीकारलेले एक तत्त्व आहे. निवडणूक किंवा मतपेटीला इतके अवास्तव महत्त्व आले आहे की त्यामुळे राजकीय सत्तेची मक्तेदारी निर्माण होते आणि लोकशाहीला धोका पोहचतो.

मनुष्यतेचे श्रेष्ठत्व हे सर्वश्रेष्ठ मूल्य होय. माणसाचे अवमूल्यन जातीय भावना, स्त्रीपुरुष भेदाभेद,उच्चनीच भावना, भाषाभेद, प्रांताभिमान, अंधश्रध्दा इ.कारणामुळे होत असते. असे माणसाचे अवमूल्यन झाले म्हणजे भारतीय समाज विघटित होईल; मग एकराष्ट्रीयत्वाची भावना कशी रूजेल ?

### ३.३.९ लोकशाहीच्या रक्षणासाठी आपल्यावरील जबाबदाऱ्या.

डॉ. आंबेडकर आग्रहपूर्वक सांगतात की.

* समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व व सामाजिक न्याय या मूल्यांची प्रस्थापना व्हावी.
* हा देश आपलाआहे तो बलवान व्हायला पाहिजे.
* विभूतिपूजेपेक्षा विचारांची पूजा महत्त्वाची.
* माणूस मोठा आहे. त्याचे अवमूल्यन करू नये.
* जात, वर्ण, वर्ग यांचा अंत करावा.
* समान संधी द्या. राष्ट्रीय संपत्तीची समान वाटणी करा.
* लोकशाहीचे रक्षण हीच देशसेवा.

---

स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(च) लोकशाहीचा आत्मा असे कोणत्या तत्त्वाबाबत म्हणता येईल ?

---

(छ) भारतीय समाजातील कोणकोणत्या उणिवांचा निर्देश केला आहे ?

---

(ज) वाक्यात उपयोग करा

१ चिंताक्रान्त बनणे.

---

२ सुरूंग लावणे.

---

३ होरपळून निघणे.

---

४ काडीमोड करणे.

---

५ त्रिवेणी संगम.

---

(झ) 'अ' गटात शब्द दिले आहेत. त्यापासून भाववाचक नामे तयार करा.

| 'अ' | भाववाचक नामे |
|---|---|
| कायदा | |
| विश्वबंधू | |
| नवीन | |
| विषम | |
| राष्ट्र | |

---

## ३.४ नमुना उत्तरे.

---

(क) (१) १६ जानेवारी १९५०; प्रजाकसत्ताक दिन, गणतंत्र दिवस

(२) स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व सामाजिक न्याय

(३) व्यक्ती कितीही महान असो तिच्या चरणी आपले स्वातंत्र्य अर्पू नका.

(४) या देशात जातिप्रथा, विषमता, शोषणाधिष्ठित समाजव्यवस्था आहे.

(ख) बौध्द भिक्षुसंघात पार्लमेंटचे कामकाजाचे नियम पाळले जात. ठराव, मतदान यासंबंधी नियम होते. निर्णयप्रक्रियेत लोकमताचा आदर केला जाई.

(ग) बेसनदशीर मार्ग

१ हिंसक निदर्शने, मोर्चा

२ सत्याग्रह

३ उपोषण

४ घेराव

(घ) सनदशीर मार्ग

१ प्रबोधन किंवा जन-जागरण

२ मागण्यांचे निवेदन

३ कायदेमंडळात प्रश्न नेणे

४ परिषदा, ठराव

(ङ) नैतिक

आर्थिक

धार्मिक

पारपरिक

लाक्षणिक

(च) एक माणूस, एक मूल्य

(छ) सामाजिक, आर्थिक लोकशाही नाही.

विषमतेच्या तत्त्वावर समाजव्यवस्था आहे.

माणसाचे अवमूल्यन

बंधुत्वाच्या भावनेचा अभाव

दारिद्य व अंधश्रध्दा.

(ज) १ वाढत्या हिंसाचारामुळे सामान्य माणूस चिंताक्रान्त बनला आहे.

२ स्वार्थामुळे विकास योजनेला सुरूंग लागतो.

३ युध्दखोरीमुळे जग होरपळून निघत आहे.

४ मूळ तात्विक भूमिकेशी काडीमोड करून स्वार्थी राजकारण करणे धोक्याचे आहे.

५ सत्य, सौंदर्य व शिव यांचा त्रिवेणी संगम साहित्यात होतो.

(झ) कायदेशीरपणा

विश्वबंधुत्व

नावीन्य

विषमता

राष्ट्रीयत्व

## ३.५ अधिक अध्ययन

### ३.५.१ लोकशाही आणि बलोपयोग

डॉ.आंबेडकरांनी घटनासमितीत १७ डिसें ४६ रोजी एक अविस्मरणीय भाषण केले. घटना समितीचे 'ध्येय व उद्दिष्ट'या बद्दलचा ठराव पं. जवाहरलाल नेहरू यांनी मांडला त्यावर डॉ.आंबेडकरांनी जे भाषण केले त्यातील महत्त्वाचे मुद्दे असे -

* मानवी हक्कांचा केवळ उल्लेख करून चालत नाही. हक्कभंग झाल्यास त्यावर उपाययोजना नसेल तर हक्क असून नसून सारखेच आहे.
* समाजवादी अर्थव्यवस्था बनवल्याशिवाय सामाजिक न्याय शक्य नाही.
* कारखाने व शेती यांचे राष्ट्रीयकरण हवे.
* 'मी भारतीय आहे' अशी प्रत्येकाने भूमिका घ्यावी.
* केवळ पाशवी बळ अंतिम विजय मिळवू शकत नाही. बळाचा उपयोग अनिश्चित असतो. सत्ता व अधिकार भीक मागून मिळत नसतात.
* देशाच्या ऐक्यासाठी सत्ता शहाणपणाने वापरवी.

### ३.५.२ लोकशाहीविषयक भारतीय राज्यघटनेतील काही विचार

लोकशाही तत्वावर आधारलेले सरकार स्थिर असेल पाहिजे. सरकाराचे स्थैर्य व जबाबदारपणा या दोन्ही तत्वांची सांगड घालणारी राज्यपध्दती अस्तित्वात आली नाही. भारताची घटना बनवतांना स्थैर्याच्या तत्त्वापेक्षा जबाबदारीच्या

तत्त्वाची अधिक पसंती केली असल्यामुळे भारतासाठी पार्लमेंटरी राज्यपद्धतीचा पुरस्कार केला असे डॉ. आंबेडकर घटनेचा मसुदा सादर करताना म्हणाले. यावर पुष्कळ चर्चा झाली.

जबाबदारीच्या तत्वाची कसोटी दैनंदिन व प्रासंगिक असते. दैनंदिन जबाबदारीच्या तत्त्वाची अमलबाजावणी, पार्लमेंटचे सभासद रोज प्रश्न विचारून, ठराव आणून, निंदाव्यंजक ठराव मांडून, तहकुबी सूचना, रोजचा वादविवाद चालवून पालमेंटमध्ये करीत असतात. प्रासंगिक कसोटी सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी दर पाच वर्षांनी मतदार करीत असतात. लोकशाहीत घटनात्मक नीती वृध्दिंगत करण्याची गरज आहे. भारतीय राज्य घटनेत मूलभूत हक्कांबरोबर मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश आहे.

### ३.५.३ लेखक परिचय

डॉ.भीमराव रामजी उर्फ बाबासाहेब आंबेडकर (१८९७-१९५६) जन्म महू येथे दापोली, सातारा, मुंबई येथे शिक्षण बी.ए.नंतरचे शिक्षण परदेशात. एम्.ए.पी एच.डी., डी.एससी, एल.एल.बी इ. पदव्या.महाडच्या धर्मसंगरापासून अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाचे नेते. भारतीय गोलमेज परिषदेत दलितांच्या न्याय्य हक्कांची मागणी. दलित, शोषित, स्त्रिया इत्यादी वर्गांसाठी आयुष्यभर संघर्ष. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार. ॲनिहिलेशन ऑफ कास्टम, हू वेअर शूद्राज, स्टेटस अंन्ड मायनोरिटीज रिडल्स इन हिंदुइझम इत्यादी अनेक ग्रंथ प्रसिद्ध. भारताचे पहिले कायदेमंत्री. १९५६ मध्ये बौद्ध धर्माचा स्वीकार. बुद्ध ॲन्ड हिज धम्म'या ग्रंथाचे लेखन.

कृतज्ञ ता : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटना समितीतील भाषणांचे भाषांतर. बी.सी.काबळे यांनी केले. सदर उतारा श्री. कांबळे यांनी संपादित केलेल्या. भारतीय राज्यघटनेची मीमांसा या पुस्तकातून घेतला आहे.

## ३.६ सारांश.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाचारोपाच्या भाषणात सांगीत ले की, या राज्यघटनेचे भवितव्य ज्या कोटयवधी भारतीय नागरिकांच्या हाती आहे त्यांनी व्यक्तिपेक्षा, पक्षहितापेक्षा देश मोठा मानावा. राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक - आर्थिक लोकशाही हवी. विभूतिपूजे ऐवजी विचारांची पूजा करावी. स्वातंत्र्य समता, बंधुत्व आणि सामाजिक न्याय या मानवी मूल्यांची स्थापना केली तर लोकशाही नांदेल. हिंसात्मक साधने व मार्ग यांचा अवलंब न करता आपापले प्रश्न सोडवण्यासाठी घटनात्मक नीतिमार्गाचे आचरण करावे. एक राष्ट्रीयत्वाची भावना, परस्पर सहकार्य सामंजस्य, समानसंधी, राष्ट्रीयसंपत्तीची व त्यापासून मिळणाऱ्या लाभांची समान वाटणी इ.गोष्टींची लोकशाहीच्या यशास्वितेसाठी गरज आहे.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय.

Mahatma's is a name that is much maligned and Satyagraha a word that is much professed in today's India. Most unGandhian and unethical acts are done in the name of Gandhi and fasts & strikes, marches and demonstrations, movements relying on sheer coercion and undisguised violence like 'bandhs' and 'ghera dalos' supported in the sacred name of Satyagraha.

Satyagraha is the agraha i.e. insistence on or holding in to Truth, through means pure and morally unquestinable like non-violent resistance, sacrifice and self-suffesing.

Duragraha is insistence on either for wrong end or for right end by wrongful and morally objectionable means or both.

Satyagraha is both a philosophy, an inner pose of one's being. Satyagraha tries to convince the wrong doer and elevate them never to coerce or embarras him. In it the appeal is to the sense of justice and fair play and not to his sense of fear and insecurity.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके.

| | |
|---|---|
| १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) | = धनजंय कीर |
| २ डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र) | = भालचंद्र फडके |
| ३ आंबेडकर विचारमंथन | = वा.ना.कुबेर |
| ४ भारतीय लोकसत्ता | = पु.ग.सहस्त्र बुध्दे |
| ५ भारतीय संविधानाचे अधिष्ठान | = चंद्रशेखर धर्माधिकारी |
| ६ डॉ.आंबेडकर व भारतीय राज्यघटना | = रावसाहेब कसबे |